डॉ. आ. ना. सूर्यकर
पीएच. डी. एफएसीबीआय
कुलसचिव

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

वणी रोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४, **Vani Road, Mhasrul, Nashik – 422 004**
**Phone :** 0253-25393837/**EPABX:** 0253-2539100-300 / **Fax:** 0253-2539200
**E-mail:** pgacademic@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com
दुरध्वनी क्र. (०२५३) २५३९१९९

जा.क्र. मआविवि/पीजी/ई. ओ./१३०५/२०११ दि. २३/०६/२०११

# परिपत्रक क्र. १४/२०११

(विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक मान्यता प्राप्त/अप्राप्त शिक्षकांठी)

प्रति,
मा. प्राचार्य / अधिष्ठाता,
सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये,
मआविवि, नाशिक - ४२२ ००४

विषय :- विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक मान्यता प्राप्त/अप्राप्त शिक्षकांसाठी Research Methodology कार्यशाळेतील सहभागाबाबत...

संदर्भ :- विद्यापरिषद ठराव क्र. ६२/२०११ दि. ०८/०४/२०११

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मा. कुलगुरु यांनी गठीत केलेल्या "Vision Committee" च्या दि. २३/०३/२०११ रोजीच्या बैठकीतील शिफारशी मा. विद्यापरिषदेच्या दि. ०८/०४/२०११ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आल्या, असता त्यावर विद्यापरिषद ठराव क्र. ६२/२०११ अन्वये झालेल्या निर्णयास अनुसरुन खालील प्रमाणे महाविद्यालयामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

१) विद्यापीठ संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालयातील शिक्षकांना पदव्युत्तर शिक्षक मान्यता प्राप्त करण्यासाठी (Post Graduate Recognition) प्रत्येक प्रस्ताव सादर करतेवेळी महाविद्यालयाने विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राच्या वैद्यकीय शिक्षण तंत्रज्ञान विभाग (Dept. of Medical Education Education Technology (MET), Pune) किंवा तत्सम मार्फत आयोजित Research Methodology कार्यशाळेतील सहभाग हा अनिवार्य करण्यात यावा.

२) विद्यापीठ संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालयातील शिक्षकांना उपरोक्त कार्यशाळेतील सहभागाबाबतची खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

अ) जे शिक्षक / अध्यापक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त आहेत व ज्यांनी मागील पाच वर्षात Research Methodology या कार्यशाळेतील सहभाग नोंदविलेला आहे त्यांनी त्याबाबत विद्यापीठास प्रमाणपत्र सादर करावे.

ब) जे शिक्षक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त आहेत व ज्यांनी मागील ०५ वर्षापुर्वी व २० वर्षात Research Methodology कार्यशाळेतील सहभाग नोंदविलेला आहे त्यांनी विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राच्या वैद्यकीय शिक्षण तंत्रज्ञान विभाग (Dept. of Medical Education Technology (MET), Pune) किंवा तत्सम मार्फत आयोजित

Research Methodology कार्यशाळेतील सहभाग पुन्हा नोंदविणे अनिवार्य आहे. (For updating the recent computerised development in Research Methodology).

क) ज्या शिक्षकांना विद्यापीठाची पदव्युत्तर शिक्षक मान्यता प्राप्त असेल परंतू Research Methodology कार्यशाळेतील सहभाग घेतलेला नसेल अशा शिक्षकांनी दि. ०१/०८/२०११ पासून ते ३१/०७/२०१२ कालावधीपर्यंत विद्यापीठाच्या वैद्यकीय शिक्षण तंत्रज्ञान विभाग (Dept. of Medical Education Technology (MET), Pune) किंवा तत्सम मार्फत आयोजित Research Methodology कार्यशाळेतील सहभाग नोंदविणे अनिवार्य आहे

ड) दि. ०१/०८/२०११ नंतर विद्यापीठाकडे पदव्युत्तर शिक्षक मान्यतेसाठी येणा-या प्रत्येक प्रस्तावासोबत Research Methodology कार्यशाळेतील सहभागाबाबतचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

३) Research Methodology कार्यशाळेतील सहभागाकरीता पदव्युत्तर शिक्षकांनी त्यांचे महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या मार्फत विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्र येथील वैद्यकिय शिक्षण तंत्रज्ञान विभाग (Dept. of Medical Education Technology, (MET), Pune) येथे संपर्क (संपर्क - मा. सहयोगी प्राध्यापक, वैद्यकिय शिक्षण तंत्रज्ञान विभाग, (MET), म.आ.वि.वि. विभागीय केंद्र, पुणे, दुरध्वनी क्र. ०२०-२७२८०४५४, २७२८५६९५) साधून सदर कार्यालयाने केलेल्या नियोजनानुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर नांव नोंदणीबाबतची योग्य ती पूर्व कार्यवाही करुन आपला कार्यशाळेच्या सहभागाबाबतचा कालावधी व ठिकाण निश्चित करुन घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त बाबींची आपल्या महाविद्यालयामार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रकाची प्रत विद्यापीठाच्या www.muhsnashik.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
कुलसचिव